# भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने

**डॉ सचिन श्रीरंग चव्हाण**
नाईट कॉलेज ऑफ आर्टस् कॉमर्स,
इचलकरंजी
मोबा. नं – ९०४९६०३४२१

**सारांश:**

लोकशाही शासनव्यवस्थेकडे जगाच्या पातळीवर एक आदर्श राज्यव्यवस्था म्हणून पहिले जाते. भारतावर इंग्रजांनी दिडशे वर्ष राज्य केले. ब्रिटीशांनी भारतात संसदीय लोकशाही संस्थांची निर्मिती करून भारतास त्यास अनुकूल संस्कृती रुजवण्याचे काम केले. भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षाचा काळ उलटला आहे. आजही भारतातील लोकशाही मोठा दिमाखात उभी आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर एवढ्या मोठा लोकसंख्येच्या देशाला एकसंध ठेवणे हे मोठे आव्हान होते. नवीन राज्यघटना निर्माण करून ती स्थिरस्थावर करणे व यातून असंख्य लोकांच्या अपेक्षांची पूर्तता करणे हे मोठे आव्हान भारतीय घटनाकारांसमोर होते. खऱ्या अर्थाने भारतीय संविधानाने लोकशाही रुजवण्याचे काम केले परंतु आज याच लोकशाही समोर अनेक आव्हाने उभी आहेत. स्वातंत्रोत्तर काळात भारतीय लोकशाहीने सामजिक, संस्कृती , राजकीय, आर्थिक व धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. मानवी समाज जीवनाच्या अनेक क्षेत्रामध्ये भारतीय लोकशाहीने आत्मनिर्भरता प्राप्त केली आहे असे असले तरी भारतीय लोकशाहीसमोर सातत्याने आव्हाने उभी राहिलेली आहेत.

**पारिभाषिक शब्द:** भारतीय लोकशाही, आव्हाने, प्रांतवाद, नक्षलवाद, दहशतवाद

प्रस्तावना –

लोकशाही शासनव्यवस्थेकडे जगाच्या पातळीवर एक आदर्श राज्यव्यवस्था म्हणून पहिले जाते. भारतावर इंग्रजांनी दिडशे वर्ष राज्य केले. ब्रिटीशांनी भारतात संसदीय लोकशाही संस्थांची निर्मिती करून भारतास त्यास अनुकूल संस्कृती रुजवण्याचे काम केले. भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षाचा काळ उलटला आहे. आजही भारतातील लोकशाही मोठा दिमाखात उभी आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर एवढ्या मोठा लोकसंख्येच्या देशाला एकसंध ठेवणे हे मोठे आव्हान होते. नवीन राज्यघटना निर्माण करून ती स्थिरस्थावर करणे व यातून असंख्य लोकांच्या अपेक्षांची पूर्तता करणे हे मोठे आव्हान भारतीय घटनाकारांसमोर होते. खऱ्या अर्थाने भारतीय संविधानाने लोकशाही रुजवण्याचे काम केले परंतु आज याच लोकशाही समोर अनेक आव्हाने उभी आहेत.

स्वातंत्रोत्तर काळात भारतीय लोकशाहीने सामजिक, संस्कृती , राजकीय, आर्थिक व धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. मानवी समाज जीवनाच्या अनेक क्षेत्रामध्ये भारतीय लोकशाहीने आत्मनिर्भरता प्राप्त केली आहे असे असले तरी भारतीय लोकशाहीसमोर सातत्याने आव्हाने उभी राहिलेली आहेत.

भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने

१. धार्मिक कट्टरता –

भारतात विविध धर्मांचे लोक राहतात. परंतु अलीकडील काळात धार्मिक कट्टरता मोठ्याप्रमाणात वाढली आहे. धार्मिक कट्टरतेमुळे धर्मा – धर्मात तेढ निर्माण होण्याचे प्रमाण वाढले आहे. प्रत्येक धर्मातील अनुयायांना आपला धर्म संकटात आहे असे वाटते यातून भडक घोषणा, नारेबाजी केली जाते आणि समाजातील स्वास्थ्य दुषित केले जाते. अलीकडील काळात घडलेल्या घटना याचा प्रत्यय देतात. यामध्ये दिल्ली दंगल २०२०, 'जेएनयू' मधील आंदोलन, उतर प्रदेश हिंसा, बंगळूर हिंसा या सर्व घटना धार्मिक कट्टरतेमुळे झालेल्या आहेत. म्हणूनच धार्मिक कट्टरता हे भारतीय लोकशाही नव्हे तर जागतिक लोकशाही समोर गंभीर आव्हान उभे राहिलेले आहे.

२. प्रांतवाद –

भारत हा विशाल खंडप्राय देश आहे. या बलाढ्य देशात प्रादेशिक असमतोल आहे. भारतात असे काही प्रांत आहेत जे सातत्याने त्यांच्यामध्ये प्रांतावरून वाद उत्पन्न होतात . उत्तर भारत आणि दक्षिण भारत हा वाद कायमचा आहे. उत्तर प्रदेश, बिहार या प्रांतातील लोकांना रोजगारासाठी महाराष्ट्र व गुजरात अशा इतर राज्यात जावे लागते परंतु प्रांतवादामुळे यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. गुजरात व महराष्ट्रात असे विशिष्ट अजेंडा असलेले पक्ष आहेत जे बाहेरून नागरिक आपल्या राज्यात आले की त्यांना स्वगृही परत जाण्यास भाग पाडतात. यामुळे प्रांतवाद वाढीस लागतो. नुकतेच कर्नाटकमध्ये शिवाजी महराजांचा पुतळा प्रांतवादामुळे विद्रूप केला. असे प्रकार सातत्याने समाजात वाढत आहेत. हे लोकशाहीला घातकच आहे.

३. नक्षलवाद –

नक्षलवाद हि प्रादेशिक समस्या न राहता ती जागतिक समस्या बनलेली आहे. हाच नक्षलवाद आज भारताच्या अखंडतेवर घाला घालू पाहत आहे. सुरवातीला भारताच्या काही विशिष्ट घटकराज्यापुरता सीमित असलेला नक्षलवाद आज भारताच्या अखंडतेला आणि भारताच्या एकात्मतेला आव्हान देतो आहे. नक्षलवादाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत असलेली पहावयास मिळते. मुस्लीम तालिबानी, तमिळ वाघ, हिंदू अतिरेकी व खलिस्तानी दहशतवादी या ज्या संघटना आहेत त्यांचे उद्दिष्ट हे धर्माच्या आधारावर समाजाचे विघटन करणारे आहे हेच लोकशाहीला घटक आहे.

४. दहशतवाद –

दहशतवाद हि समस्या हळूहळू व्यापक होत चालली आहे. दहशतवादाचा कमी अधिक फटका सर्वच राष्ट्रांना बसतो आहे. भारताला दहशतवादामुळे मोठ्याप्रमाणात मानवी व आर्थिक हानीला सामोरे जावे लागते आहे. जम्मू काश्मीर व भारताच्या इतर भागात सातत्याने दहशतवादी कारवाया होत आहेत. भारताची आर्थिक व्यवस्था खिळखिळी करणे, नागरिकांमध्ये दहशत बसविणे, प्रादेशिक एकात्मतेला आव्हान देणे, हिंदू – मुस्लीम जातीय दंगली भडकावून देणे, भारताला अस्थिर करणे असे अनेक उद्देश यापाठीमागे आहेत. म्हणूनच दहशतवाद हे लोकशाहीला मोठे आव्हानच आहे.

५. भ्रष्टाचार –

भारतामध्ये भ्रष्टाचाराने आज सर्वच क्षेत्रात हस्तक्षेप केला आहे. अगदी ग्रामपंचायतीपासून ते दिल्लीपर्यंत भ्रष्टाचाराने थैमान घातले आहे. शासन आणि लोकप्रशासनाच्या प्रत्येक स्तरावर भ्रष्टाचाराचा अनुभव येतो आहे. भ्रष्टाचाराची अशी काही नेमकी

उदाहरणे पहिली तर भ्रष्टाचाराने किती आक्राळ विक्राळ रूप धरण केले आहे हे समजून येईल. संरक्षण खात्यातील शस्त्रास्त्रे खरेदी प्रकरण, बोफोर्स प्रकरण, भूखंड विक्रीप्रकरण, हवालाकांड, टुजी स्पेक्ट्रमघोटाळा, कोळसा खाण वाटप इत्यादी उदाहरणावरून भ्रष्टाचाराने आपल्या राष्ट्रापुढे व समाजापुढे किती गंभीर आव्हान उभे केल आहे. आपल्या देशाच्या लोकशाही व्यवस्थेला भ्रष्टाचारामुळे मोठा धोका उत्पन्न झाला आहे.

६. वाढती लोकसंख्या-

वाढती लोकसंख्या हे भारतीय लोकशाही समोरील एक मोठे आव्हान आहे. भारताची लोकसंख्या निरंतर वाढत चालली आहे. शासनाने लोकसंख्या आटोक्यात आणण्यासाठी वेळोवेळी प्रयत्न केले आहेत. तरीही लोकसंख्या वाढीचा वेग आटोक्यात आलेला नाही. आज जागतिक स्तरावर भारत लोकसंखेच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. एकूण जगाच्या लोकसंख्येत भारताचा वाटा १७ टक्के आहे तर जमीन मात्र २.५ टक्के आहे. यावरु असे लक्षात येते की वाढत्या लोकसंख्येमुळे समाजात इतर समस्या निर्माण होत आहे. बेरोजगारी, भूकबळी अशा अनेक समस्या निर्माण होत आहेत.

७. बेरोजगारी –

वाढत्या लोकसंख्येमुळे बेरोजगारी हे एक लोकशाही समोर आव्हान निर्माण झाले आहे. प्रचंड लोकसंख्येमुळे प्रत्येकाच्या हाताला काम देणे शासनाला शक्य नाही. २०१६ मध्ये उच्चशिक्षित बेरोजगारी ४१.१ टक्के होती. ती २०१७ मध्ये ४२टक्के, तर २०१८ मध्ये त्यात वाढ झाली व ती ५५ टक्के एवढी झाली. एका अभ्यासानुसार २०१९ मध्ये २५ ते ३० वर्षातील असंख्य उच्चशिक्षित युवकांना कामच मिळाले नाही. याचे प्रमाण ४७ टक्के एवढे होते व २०२० मध्ये तर कोरोना ने कहरच केला त्यामुळे असंख्य लोकांना बेरोजगार रहावे लागले आहे. हि समस्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे.

८. दारिद्र्य –

लोकशाही समोर आणखी एक आव्हान म्हणजे दारिद्र्य होय. आर्थिक विषमतेमुळे समाजात श्रीमंत व गरीब अशी विषमतेची मोठी दरी निर्माण झाली आहे. भारतामध्ये सर्वात वरच्या ठरतील २० टक्के लोकसंख्येकडे ४७ टक्के संपती आहे याउलट तळाच्या २० टक्के लोकसंख्येकडे फक्त ८ टक्के एवढिक संपत्ती आहे. जे लोक दरिद्री आहेत ते अशिक्षित आहेत व निरक्षरही आहेत याचा परिणाम राष्ट्राच्या आर्थिक विकासावर होतो. अर्थात लोकशाही मध्ये जे सामाजिक न्यायचे तत्व आहे ते येथे प्रस्थापित होत नाही.

**निष्कर्ष** –

भारतीय लोकशाही ला जगातील आदर्श लोकशाही म्हणून ओळखले जाते. गेल्या ७५ वर्षाच्या कालखंडात भारतीय राजकारणात अनेक छोटे - मोठे बदल होत आलेले आहेत. लोकशाहीमध्ये सर्व नागरिकांचा राजकीय सहभाग अपेक्षित असतो. लोकशाहीमध्येच सर्वाना समान लेखले जाते, सर्वांना समान न्याय दिला जातो. परंतु आज लोकशाहीसमोर जी आव्हाने निर्माण झालेली आहेत त्यामुळे समाज जाती – जातीत विभागला जात आहे. निवडणुकित मताचे मूल्य ठरवले जात आहे. बनावट मतदान, निवडनुकी प्रती लोकांची उदासीनता, भ्रष्टाचार अशा एक ना अनेक लोकशाही विरोधी मुल्यांचा वावर आज समाजात आहे म्हणूनच खर्या अर्थाने लोकशाही धोक्यात आली आली आहे.

**संदर्भ :**

१. भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण – डॉ. भा . ल. भोळे पिंपळापूरे पब्लिशर्स, नागपूर

२. आधुनिक भारतातील राजकीय विचार - भा . ल. भोळे, पिंपळापूरे पब्लिशर्स, नागपूर

३. भारतीय राज्य व शासन व्यवस्था – लोटे. रा. ज पिंपळापूरे पब्लिशर्स, नागपूर

४. लोकशाही एक चिंतन – सुरवाडे दिलीप (संपादक), लोकसाहित्य प्रकाशन औरंगाबाद